बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०१ ऑक्टोबर २०२४**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८२/२०२४, भा.न्या.सहिता क ११८(१),११५(२),३५२,३५१(३),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ३०/०९/२०२४ रोजी ०९.३० वा. पार्क चौक सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०९/२०२४ रोजी १८.०५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सत्यजीत गणेशदास परदेशी,वय-३४ वर्षे,रा- लक्ष्मीनारायण अपार्टमेंट प्लॅट नं ०१ दक्षिण सदर बझार सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अग्निवेश नकाते वय-३० वर्षे रा- बाळे सोलापूर २) त्याचे दोन अज्ञात साथीदार रा-माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे जिल्हा स्तरीय स्पर्धा असल्याने कोचीग करण्यासाठी आले होते व फिर्यादी व त्याचा मित्र कपिल कोळी असे चहा पिण्याकरीता जात असताना समोरून दोन अज्ञात इसम आले व फिर्यादीस तु माझे मित्र नकाते बद्दल मागे का बोलतो असे म्हणाला त्यावेळी फिर्यादी त्यांना तुम्ही कोण आहात मी ओळखत नाही त्यांना समोर घेवून या असे म्हणाले असता त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून तुला लय मस्ती आली आहे असे म्हणून हाताने मारहाण करण्यास सुरूवात केली त्यांनतर आरोपी क्र १ हा त्यांची मो.सायकल क्र एमएच १३ सी एच ८५३९ वर आला व त्यानेही फिर्यादीस शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्यांनी मारहाण केली आहे तसेच त्यातील एकाने रस्त्यावर पडलेला दगड उचलून फिर्यादीचे पाठीवर,हातावर मारहाण केली तसेच आरोपी क्र १ याने गाडीचे चावीने फिर्यादीचे तोंडावर व छातीवर मारहाण करून जखमी केले आहे व तुला खल्लास करतो अशी धमकी दिली आहे.म्हणून. तपास:- पोना/१४२१/मुलाणी- |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८४/२०२४, भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २७/०१/२०२३ ते दि ०९/०४/२०२४ पर्यत फिर्यादीचे सासरी वडगाव |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०९/२०२४ रोजी २०.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | स्नेहल निखील शिंदे,वय-३० वर्षे,रा- बी/६ स्वप्नील निवास अभिषेक नगर मुरारजी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) निखील शिंदे (पती),२) किरण शिंदे (सासू) ३) रविंद्र शिंदे(सासरे) ४) गिंतांजली हणमघर (नंणद) रा- वडगाव |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २७/०१/२०२३ ते दि ०९/०४/२०२४ च्या दरम्यान यातील फिर्यादी हे सासरी नांदत असताना यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी मिळून फिर्यादीस घरातील सर्व लोकांसाठी स्वयंपाक तु एकटीनेच बनवायचा व सर्व कामे तुच करायची तुला जेवण बनवता येत नाही लग्नात योग्य तो मानपान दिला नाही मुलास भरपुर दागिने घातले नाही चारचाकी वाहन किंवा घर दिले नाही तुझ्या पगारावर नवरा म्हणून माझा अधिकार आहे तु खर्च करायचे नाही पुणे येथे तुझ्या नावावर लोन करून घर घ्यायचा आहेस परंतु सदर प्लॅट तु आमचे नावाचे घ्यायचा आहे परतफेड तुझ्या पगारीतून करायची आहे हे लक्षात ठेव आणि प्लॅट बुकीगकरीता माहेरून १० लाख रूपये घेवून ये असे म्हणून मानसिक व शारीरीक त्रास देवून हाताने मारहाण करून जाचहाट व छळ केला आहे.म्हणून. तपास:- पोना/७३२/कामुर्ती- ८८०५०५१३०० |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६८१/२०२४, भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २८/०७/२०१४ ते दि ३१/०३/२०२४ रोजी पर्यत फिर्यादीचे सासरी गुजरात |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ३०/०९/२०२४ रोजी २१.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सोनाली सत्यकुमार शेठ,वय-३८ वर्षे,रा- २४/३१ नाईकवाडी नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सत्यकुमार (पती),२) महेंद्रकुमार (सासरे),३) ज्योतीबेन (सासू), ४) हिरनेकुमार (दीर) ५) मोनलबेन (जावू),सर्व रा- वर्धमान कॉलनी वाढवण जि.सुरेंद्र नगर राज्य गुजरात. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही सासरी नांदत असताना यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी मिळून फिर्यादीस लग्नात योग्य मानपान केले नाही सोने घातले नाही,हुंडा दिला नाही यावरून घालून पाडून बोलणे,उपाशी ठेवणे व रात्री उशीरा शिळेपाळे खायला देणे व दुकानातील व घरातील कामे लावून त्रास देवून फिर्यादीस माहेरील लोकांना फोनवर बोलण्यास देत नव्हते आरोपी क्र ३ हा किरकोळ कारणावरून लाथाबुक्यांनी मारहाण करीत असत व आरोपी क्र २ व ५ यानी तुला नीट काम येत नाही असे म्हणून शिवीगाळ करून त्रास देवू लागल्याने फिर्यादी माहेरी आली असता आरोपी क्र १ याने आता आपले घटस्फोट झाले असे म्हणून तु आता माहेरी जा असे म्हणून घरातून हाकलून दिले आहे.म्हणून. तपासः- पोह/५८७/पवार-९८२३३५४०४८ |